# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्तविभाग

## राष्ट्रीय बातमीपत्र

## सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.03.2026** **वारः रविवार**

---

1. **'**विकसित भारत**'** घडवण्यासाठी आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये अभूतपूर्व गुंतवणूक; पश्चिम आशियातील संघर्षाच्या परिस्थितीतही भारताची अविरत प्रगती सुरू :**:** पंतप्रधान
2. एलपीजीची आणखी एक खेप गुजरातच्या वदिनार बंदरावर दाखल, देशात पेट्रोल डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध
3. आकाशवाणीवरील 'मन की बात' च्या 132 व्या कार्यक्रमातून पंतप्रधान आज जनतेशी संवाद साधणार

   **आणि**
4. महिला एकेरी विजेत्या- बेलारूसच्या आर्यना सबालेंका हिने पटकावला, यंदाचा मायामी ओपन टेनिसचा किताब

**मोदी**

**'**विकसित भारत**'** घडवण्यासाठी आपलं सरकार आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये अभूतपूर्व गुंतवणूक करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. काल दुपारी उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातील जेवर इथे **'**नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळा**'**च्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन केल्यानंतर बोलताना**,** मोदी यांनी गेल्या अकरा वर्षांत पायाभूत सुविधांसाठीच्या अर्थसंकल्पात सहा पटींहून अधिक वाढ करण्यात आल्याचं सांगितलं. या कालावधीत महामार्ग आणि

द्रुतगती मार्गांवर १७ लाख कोटींहून अधिक रुपये खर्च करण्यात आले असून, एक लाख किलोमीटरहून अधिक लांबीचे महामार्ग बांधण्यात आले आहेत.
काश्मीर खोरं आणि ईशान्य भारतातील राज्यांच्या राजधान्या रेल्वेने जोडल्या जात आहेत. गेल्या दशकात बंदरांची क्षमता दुप्पटीहून अधिक झाली असून, देशांतर्गत जलमार्गांची संख्याही सातत्याने वाढत आहे.
'नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ' हा देशातील सर्वात मोठ्या 'ग्रीनफील्ड' विमानतळ प्रकल्पांपैकी एक असून त्यासाठी ११ हजार २०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे.

**मोदी आशिया**

दरम्यान गेल्या एक महिन्यापासून पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे अनेक देशांना अन्नधान्य, पेट्रोल-डिझेल, गॅस आणि खतांसारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या तुटवड्याचा सामना करावा लागत आहे. मात्र संघर्षाच्या परिस्थितीतही भारत अविरत प्रगती करत आहे असं मोदी यांनी सांगितलं. या संकटाला शांत चित्ताने आणि संयमाने सामोरं जाण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे. संयम हा भारतीयांचा सर्वात मोठा सामर्थ्यबिंदू असल्याचं त्यांनी नमूद केलं. पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या संकटाचा सामना करण्याबाबत आपण संसदेत सविस्तर भाष्य केलं असून, विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**एलपीजीखेप**

एलपीजीची आणखी एक खेप गुजरातच्या वदिनार बंदरावर दाखल झाली आहे. ४७,००० मेट्रिक टन एलपीजी घेऊन कुवेतहून निघालेलं 'जग वसंत' हे जहाज 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' यशस्वीरित्या पार केली. या एकूण मालसाठ्यापैकी १७,००० मेट्रिक टन एलपीजी कांडला बंदराकडे पाठवला जाईल, तर उर्वरित साठा मुंबई आणि न्यू मंगलोर बंदरांकडे वितरित केला जाईल.

**निवेदन-केंद्र**

पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने देशातल्या सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा पुनरुच्चार केला आहे. सर्व तेल शुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू असून, काल एकाच दिवसात ५४ लाखांहून अधिक एलपीजी सिलिंडरचं वितरण करण्यात आलं आहे. परदेशात अडकलेल्या भारतीयांच्या सुरक्षेसाठी सरकारने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले असून, आतापर्यंत ५ लाख नागरिक मायदेशी परतल्याची माहिती केंद्र सरकारने दिली आहे.

**तुटवडानाही**

दरम्यान भारताकडे केवळ काही दिवसांचाच इंधन साठा शिल्लक असल्याचा दावा करणाऱ्या सोशल मीडिया पोस्ट्स पूर्ण चुकीच्या असून देशात कुठेही पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीचा तुटवडा नसल्याचं - पत्रसूचना कार्यालयाच्या सत्य शोधन समितीनं नमूद केलं आहे. इंधनाच्या पुरवठ्याची स्थिती स्थिर आणि सुरक्षित असून, त्यावर सातत्याने देखरेख ठेवली जात असल्याचंही पुढे म्हटलं आहे.

**ई-गव्हर्नन्स सुधारणा**

महाराष्ट्रात , दीडशे दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा' कार्यक्रमांतर्गत निवडलेली, उत्कृष्ट कार्यालयं आणि कर्मचाऱ्यांचा  राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल मुंबईत सत्कार करण्यात आला. पुणे जिल्हा परिषदेनं राज्यात पहिला क्रमांक तर सोलापूर जिल्हा परिषदेनं दूसरा क्रमांक पटकावला. सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, नाशिक जिल्ह्यात कायद्याचा बालेकिल्ला उपक्रम राबविणारे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि

विश्वासार्हतेच्या त्रिसूत्रीवर सर्व विभागांनी काम करावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**<u>राजनाथपश्चिमआशिया</u>**

पश्चिम आशियातील बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सदैव सतर्क राहण्याचं महत्त्व सांगून याबाबत सक्रिय आणि समन्वयाचा  दूरदृष्टीकोन ठेवण्याची आवश्यकता,  संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी अधोरेखित केली आहे. काल सायंकाळी नवी दिल्ली इथे, वरिष्ठ मंत्र्यांचा समावेश असलेल्या 'मंत्र्यांच्या अनौपचारिक गटा'च्या बैठकीत त्यांनी हे विचार मांडले. या बैठकीला केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन, हरदीप सिंग पुरी, जे.पी. नड्डा, जितेंद्र सिंह, के. राममोहन नायडू आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

**<u>मोदीसंभाषण</u>**

२४ मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात झालेला दूरध्वनी संवाद केवळ या दोन नेत्यांपुरताच मर्यादित होता असं परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केलं आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील अब्जाधीश इलॉन मस्क हे देखील या संभाषणात सहभागी झाले होते, अशा आशयाच्या वृत्तांवर प्रतिक्रिया देताना मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी ही माहिती दिली.

**<u>इराण</u>**

दुबईमधील अमेरिकन सैन्याच्या दोन "लपण्याच्या ठिकाणांवर" इराणच्या 'इस्लामिक रिव्होल्यूशन गार्ड्स कॉर्प्स'ने अचूक क्षेपणास्त्रे हल्ले आणि ड्रोन हल्ले केल्याचा दावा इराणणे केला आहे. या ठिकाणांवर अमेरिकन सैन्याचे ५०० हून अधिक सैनिक होते. दुबईमधील रुग्णवाहिका अमेरिकन मृतदेह आणि जखमींना हलवण्यात अनेक तास व्यस्त होत्या असंही इराणच्या प्रवक्त्याने म्हटलं आहे.

अमेरिकेच्या **'**सेंट्रल कमांड**'**ने मात्र दुबईमध्ये कोणत्याही अमेरिकन जवानावर हल्ला झाला नसल्याचं  म्हटलं आहे.
दरम्यान**,** इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेशकियान यांनी आखाती देशांना अमेरिका-इस्त्रायल युतीला पाठिंबा न देण्याबाबत सावध केलं आहे . जर आपल्या देशाची प्रगती आणि सुरक्षितता हवी असेल**,** तर इराणवर हल्ला करण्यासाठी अमेरिका आणि इस्त्रायलला आपल्या भूमीचा वापर करू देऊ नये**,** असा इशारा त्यांनी या देशांना दिला आहे .

**'मन की बात'**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमातून देश-विदेशातील जनतेशी संवाद साधतील. या मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा १३२ वा भाग आहे. याचं प्रसारण संपूर्ण आकाशवाणी आणि दूरदर्शन वाहिन्या, तसंच 'AIR News' च्या संकेतस्थळावर आणि 'Newsonair' या मोबाईल ॲपवर केलं  जाईल. या कार्यक्रमाचं  थेट प्रक्षेपण 'AIR News', 'DD News', पंतप्रधान कार्यालय (PMO) आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या YouTube वाहिन्यांवरही उपलब्ध असेल. हिंदीतील प्रसारणापाठोपाठ लगेचच, आकाशवाणीवरुन   या कार्यक्रमाचं  प्रसारण प्रादेशिक भाषांमध्येही केलं जाईल .

**नेपाळ**

नेपाळमध्ये **UML** पक्षाचे अध्यक्ष के.पी. शर्मा ओली यांच्या अटकेनंतर**,** **CPN-UML** चे कार्यकर्ते काठमांडू खोऱ्यात रस्त्यावर उतरले. काठमांडू इथल्या बाबर महालमध्ये असलेल्या जिल्हा न्यायालयासमोर आंदोलकांनी निदर्शनं केली. **CPN-UML** च्या समर्थकांच्या विविध संघटनांनी एकत्रितपणे **'**मैतीघर मंडला**'** इथून निषेध मोर्चा काढला आणि प्रतिबंधित क्षेत्राच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता पोलीस आणि आंदोलक यांच्यात काही काळ चकमकही  झाली.

## खेलो इंडिया ट्रायबल स्पर्धा

छत्तीसगढमधल्या रायपूर इथे सुरु असलेल्या पहिल्या खेलो इंडिया आदिवासी स्पर्धेत महिलांच्या भारोत्तोलन प्रकारात छत्तीसगडच्या निकीतानं ७७ किलोग्रॅम वजन गटात काल पहिलं सुवर्णपदक पटकावलं. ओडिशाच्या महिला जलतरणपटूंनी ३ सुवर्णपदकांवर नाव कोरलं. रितिका मिंजनं 100 मीटर फ्रीस्टाइल, अंजली मुंडानं 50 मीटर बॅकस्ट्रोक आणि १ सांघिक अशी सुवर्ण पदकं जिंकली. यामध्ये महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी १ सुवर्ण, ३ रौप्य आणि एका कास्य पदकाची कमाई केली. नागपूरच्या तन्वी धुर्वेने - सुवर्ण, पलाश ठाकुरने रौप्य आणि कास्य पदकं पटकावली. या स्पर्धेत कर्नाटक 15 सुवर्ण , ६ रौप्य आणि तीन कास्य पदकांसह पदकतालीकेत पहिल्या स्थानावर आहे. ओडिशा सात सुवर्ण , तीन रौप्य आणि 10 कास्य पदकांसह दुसऱ्या स्थानावर तर यजमान छत्तीसगढ़ एक सुवर्ण, चार रौप्य आणि तीन कास्य पदकांसह सातव्या स्थानावर आहे.

## मायामीओपनटेनिस

फ्लोरिडामध्ये सुरू असलेल्या मायामी ओपन टेनिस स्पर्धेत, महिला एकेरीच्या अंतिम फेरीत बेलारूसच्या आर्यना सबालेंकानं, अमेरिकेच्या कोको गॉफला 6–2, 4–6, 6–3 नं पराभूत करत मायामी ओपन किताब पटकावला. ती, 2022 मध्ये इगा स्वियाटेक नंतर, सनशाईन डबल पूर्ण करणारी पहिली तर हा किताब पटकावणारी पांचवी खेळाडू ठरली आहे. यापूर्वी स्टेफीग्राफ, किम क्लिस्टर्स, व्हिक्टोरिया अजारेंका आणि स्वियाटेक यांनी ही कामगिरी केली आहे. पुरुष एकेरीत चेक खेळाडू जिरी लेहेकाचा सामना आज इटलीच्या जागतिक दुसऱ्या क्रमांकाचा खेळाडू जॅनिक सिनर-शी, होणार आहे.

याबरोबच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार